*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-05, Issue-II November 2014*

# शिक्षणाच्या तत्वज्ञानाचे भारतीय संप्रदाय - वैदिक संप्रदाय

**प्रा.डॉ. अजयकुमार रामदास इंगळे:** समर्थ शिक्षणशास्त्र,महाविद्यालय,भाडणे, ता.साक्री,जि.धुळे

प्राचिन भारतीय शिक्षणात वेद, वाड्मयाला अनन्यसाधारण महत्व होते. वेद प्राचिनतम ऋषींनी लिहिलेले आहे. वेदांमध्ये जग आणि ईश्वराचे स्वरुप समजुन घेण्याचा प्रयत्न आहे. वेदात मंत्रांचा समावेश आहे ऋचाचा समावेश आहे त्यात अनेक मंडले, प्रकरणे आहेत. ऋग्वेद तर अत्यंत प्राचिन वेद आहे. त्यात भौतिक समृध्दीसाठी देवतांची स्तुती आहे. यजुर्वेदात यज्ञप्रसंगी म्हणावयाचे मंत्र आहेत. सामवेद व अर्थववेद यात तत्कालीन समाजाचे वर्णन आहेत. वेदांची रचना इ.स. पू. ४५०० ते इ.स. पू.२५०० पर्यंत झाली आहे. हाच वैदिक काळ - या वैदिक काळात प्राचिन भारतात गुरुगृही शिक्षण चाले वैदिक काळात धर्म प्रवृत्तीपर होता. आयुष्य सुखा समाधानाने जावे म्हणुन देवदेवतांना प्रार्थना करीत यज्ञ करीत सुसंस्कृतपणा व सद्‌गुण, आंनदीवृत्ती आणि साधी राहणी ही वेदकाळातील वैशिष्टये होती. ही वैशिष्टये तत्कालीन संस्कारामुळे म्हणजेच शिक्षणामुळे प्राप्त झालेली होती. शिक्षणाचे एक तत्वज्ञानच निर्माण झालेले होते. हे तत्वज्ञान म्हणजे शिक्षणाचे वैदिक तत्वज्ञान होय -

## (१) शिक्षणाची ध्येये -

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा - ज्ञानचक्षु आहे. शिक्षण न घेणारी व्यक्ति पशुसमान आहे असे वेदकाळात समजले जाई. व्यक्तीचा सर्वांगीण व समतोल विकास शिक्षणानेच होतो म्हणुन शिक्षणाची सुव्यवस्था होती वेदकाळात शिक्षणाच्या सामर्थ्यांवरच विद्येचे जतनही झाले आणि विद्याही वाढली. जीवनसंपन्न करण्यासाठी ज्ञान एक साधन मानले जाई.

### अ) आत्म साक्षात्कार -

आत्म्याच्या उथ्थानासाठी शिक्षण प्रक्रियेत विविध प्रकारची साधना केली जाई. या साधनेत भौतिक मोहापासुन मनाला रोध कसा करता येईल या विषयी सांगितले जाई. भौतिक प्रलोभनापासुन मनाला परावृत्त केले जाई. शिक्षणाचा कल आत्मसाक्षात्कार आणि चित्तवृत्तीच्या निरोधाकडे होता.

### ब) मोक्षप्राप्तीसाठी मदत -

मोक्षमार्गावर वाटचाल करण्यासाठी मन शुध्द व पवित्र हवे, त्यासाठी धार्मिक संस्कारांची गरज मानली जाई. विद्यार्थ्यांच्या धार्मिक भावनेच्या विकासावर भर देण्यात येत असे. शिक्षणात व्रत-वैकल्ये, उत्सव, सण यांचा समावेश असे मानवी मनाला ऐहिक गोष्टींपासुन मुक्त करुन मोक्षप्राप्तीसाठी मदत व्हावी असा एकूण शिक्षण व्यवस्थेचा भरवसा होता.

www.ghrws.in

*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-05, Issue-II November 2014*

**क) चारित्र्य निर्मिती व संवर्धन -**

व्यक्तिच्या चारित्र्याला, शीलाला महत्व देण्यात येत असे. शील प्राप्ती झाल्याशिवाय मोक्षप्राप्ती होणार नाही अशा दृढ विश्‍वासातुन सद्‌गुणांची साधना केली जाई. त्यासाठी आश्रमात गुरुंचा सहवास, महापुरुषांच्या कथांचे श्रवण, धार्मिक आचरण अशा गोष्टींचा अवलंब होई. वैयक्तिक चारित्र्याशिवाय समाज चारित्र्यवान होणार नाही अशी ही सामाजिक दृष्टी या ध्येयामागे होती.

**ड) व्यक्तिमत्वाचा विकास -**

वेदकाळात ऋण संकल्पना होती, शिक्षणातून सामाजिक ऋण फेडण्याची भावना निर्माण केली जात असे भूतदया, मनुष्यऋण, अतिथिऋण, मातृ-पितृऋण मानलेले होते. आश्रमपध्दती अस्तित्वात होती. गुरुगृहीत विविध आश्रमपध्दतीतील कर्तव्ये शिकवली जात. ब्रह्मचर्याश्रमात विद्याग्रहण करावी. गृहस्थाश्रमात विद्यादान प्रजोत्पत्ती सामाजिक ऋण फेडणे वान प्रस्थाश्रमात मार्गदर्शन करणे अशा कर्तव्यांची ओळख करुन दिली जाई. वैयक्तिक व सामाजिक जीवन यशस्वी कसे होईल यावरही भर दिला जाई.

**इ) संस्कृती संरक्षण -**

अनेक शतके काळजीपूर्वक जतन केलेले वाड्‌मय व संस्कृती अविच्छिन्न स्वरुपात भावी पिढीस प्राप्त व्हावी. अनुवंशीक धंद्यातील कसब बापाकडून अगर गुरुकडून मुल्यास प्राप्त होऊन त्यांच्या कडून त्यास ते पुढील पिढीस मिळावे याबद्दल शिक्षण पध्दतीचा फार कटाक्ष असे वेद म्हणुन वेद संरक्षणाच्या कामास गुरुशिष्य वाहुन घेत न्याय, व्याकरण, मिमांसा, वेदांत अशा विषयाच्या अध्ययनामध्ये संस्कृती संरक्षण व प्राचिन ग्रंथ संगोपन हे ध्येय होते.

**(२) अभ्यासक्रम -**

**अ) समाजोपयोगी कार्य व परंपरांचे जतन -**

वेदांबरोबरच छंदशास्त्र, कला, व्याकरण, तर्कशास्त्र, ज्योतिष, निरुक्त या विषयांचा अभ्यास असे मानवाच्या लौकीक आणि पारलौकीक गरजा ओळखुन शिक्षणाची आखणी केली होती. देवक्रम, गुरुक्रम,समाजक्रम यातुन मुक्त होण्यासाठी अनुक्रमे धार्मिक आचार विचारांचे पालन,अध्ययन, अध्यापनाचे कार्य आणि समाजपयोगी कार्य आणि परंपराचे जतन शिक्षणाद्वारे केले जात असे.

**ब) शिक्षणक्रमात संस्कारांना महत्व -**

शिक्षणक्रमात 'संस्कारांना' महत्व होते, 'गर्भादान' संस्काराने शुध्द शरीराचा पाया घातल जात असे तर 'उपनयन' संस्कारामुळे मनाची शुध्दी राखली जात असे. 'विद्यारंभ- पाचव्या वर्षी सुरु होई तेव्हा 'विदयारंभाचा'संस्कार केला जात असे. गुरुजींच्या मदतीने अक्षरे गिरवावी लागत

www.ghrws.in

*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-05, Issue-II November 2014*

'उपनयन' संस्कार ५ ते ८ वर्षांच्या काळात करण्यात येई. शिष्याला प्रथम गायत्री मंत्राचा उपदेश देण्यात येई त्यानंतर त्याचे वेदाध्यायन सुरु होई पवित्र गायत्री वेदांचे शिक्षण घेण्यासाठी मुल /बायका /शिष्य शारिरीक व मानसिक दृष्टीने पवित्र व शुध्द करुन घेतले जात. विद्याभ्यास संपल्यानंतर समावर्तनाचा संस्कार होई. समावर्तन प्रसंगी शिष्याला उपदेश दिला जाई. त्याला सुखी, समृध्द जीवन प्राप्त व्हावे म्हणून आशिर्वाद दिला जाई.

क) उत्तम संस्कार -

गुरुकूल पध्दती अस्तित्वात होती. ज्ञान संपन्न गुरुंचा सहवास शिष्यांना अखंड मिळे. कौटुंबिक वातावरण असे शिस्त, शांतता, संयम, त्याग आणि प्रेम यांचे धडे आपोआप मिळत. गुरुकुलाचे वातावरण पवित्र धार्मिक व आल्हादायक असे त्या वातावरणाचा उत्तम संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर होत असे.

इ) पाठांतर अभ्यासक्रमांचा गाभा -

वैदिक मंत्र, इतिहास, भूमिती, व्यत्पत्तीशास्त्र यांही विषयाचा अभ्याक्रमात समावेश होतो. विद्यार्थी वैदिक सुक्त पाठ करी स्वर आधार यावर विशेष भर दिला जाई. शिष्यांना सोपे जावे म्हणून गुरु अर्थ स्पष्ट होण्यासाठी जुन्या दुर्बोध शब्दांच्या ऐवजी नवे सोपे शब्द बदलून वापरीत मंत्रांचे,वेदांचे पाठांतर हा एकूणच अभ्यासक्रमाचा गाभा होता. मंत्र पाठाबरोबर मंत्रार्थही पाठाबरोबर समाजावून सांगीतला जाई. वेदपाठ आणि वेदार्थ यांचा अभ्यास संपल्यावर विद्यार्थ्यांना 'याज्ञिकप्रक्रिया' शिकण्यासाठी गुरुगृही आणखी चार-पाच वर्षे घालवावी लागत.

ई) वाड्मयात्मक व धंदे शिक्षण दिले जात होते -

वाङःमयात्मक शिक्षण व धंदे शिक्षण यांची फारकत झालेली नव्हती. ब्रह्माविद्या शिकण्यासाठी आलेल्या नारदास जेव्हा सनद कुमारांनी तु काय काय शिकला आहेस असे विचारले तेव्हा वेदांप्रमाणे ज्योतिता लष्करी विद्या, गायन कला मला येतात असे त्यांनी सांगितले यावरुन असे लक्षात येते की, वाङःमय तत्वज्ञान व भौतिक कला, उद्योग, धंदे यांचा अभ्यासक्रमात समावेश होता.

## (३) अध्यापन पध्दती -

शैक्षणिक तत्वज्ञानातील वैदिक भागात या भारतीय संप्रदायात गुरुकूल पध्दती हे एक वैशिष्टय होते. उपनयन संस्कार झाल्यानंतर शिष्य गुरुजवळ रहात असे. गुरुगृही एक घटक म्हणून राहुन ज्ञानार्जन करीत असे गुंरुच्या जीवनाचा आदर्श त्याच्यापुढे असे लेखन कलेचा विकास झालेला नसल्यामुळे अध्यापनात मौखिकतेवर भर होता.

www.goeiirj.in

*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-05, Issue-II November 2014*

**अ) मौखिकता -**

शिष्यांना सामोर बसवून गुरु संथा देत, गुरुमुखातून ऐकलेले विषयावर शिष्य 'चिंतन' करीत पूढील पाठ शिकविण्याच्या आधी मागील पाठावर तोंडी परिक्षा घेतली जात असे. अगोदरचा पाठ पाठांतर झाल्याशिवाय नंतरचा पाठ देण्यांत येत नसे. चिंतन व स्वाध्याय यावर एकूण भर असे.

**ब) उच्चार शुध्दतेवर भर होता -**

शिष्य गुरुंच्या उच्चारांचे अनुकरण करीत प्रत्येक अक्षराच्या ध्वनीवर शब्दांच्या अवयवांवर जोर दिला जात असे. प्रत्येक दिवशी दोन तीन मंत्र शिकविले जात मंत्रातील दोन-दोन शब्द गुरुजी उच्चारीत व त्यानंतर शिष्य त्याचे अनुकरण करीत असे. चुकांची दुरुस्ती ताबडतोब केली जाई शिष्याला बिनचूक उच्चार यावयास लागले की तो मंत्र विद्यार्थ्यांना पाठ करण्यास सांगण्यास येत असे.

सारांश अध्यापनाची अशी 'वैयक्तिक' पध्दती होती.

या सर्व अध्यापन -पध्दतीचा गामा पाठांतर होता पण पाठांतर यांत्रिक स्वरुपाचे नव्हते. शब्द आणि अक्षर यामागे असलेल्या सत्याचा साक्षात्कार होणे आवश्यक असे.

वाद-विवाद, संवाद, परिषदा, प्रश्नोत्तरे अशाही मार्गांचा अवलंब होई. त्यामुळे विद्यार्थी निष्क्रीय राहत नसत. अध्यापन पध्दतीत मानसशास्त्राचा आधार घेतलेला होता. शिष्याची मानसिक बौध्दिक योग्यता व क्षमता पाहुन त्याला शिकविले जात असे. वेद-मंत्रांच्या संरक्षणासाठी आचार्य - तोंडी व चिंतन या पध्दतींचा बाहय स्वरुपाचे रक्षण होई तर चिंतनामुळे मंत्रांच्या अंतरंगाचे अर्थाचे रक्षण होई.

पाठांतराच्या पध्दतीत गुरु प्रथम आपल्या शिष्यांना छंदाची माहिती देत. नंतर छंद बध्द मंत्रातील शब्द अक्षर आणि ध्वनी यांची माहिती देत शिष्य तो मंत्र आत्मसात करीत. पाठांतर, स्वरविज्ञान व वर्णोच्चार शास्त्रावर यावर आधारलेले होते स्वरात चूक झाली अथवा उच्चार नीटपणे उच्चारला गेला नाही तर 'शब्द ब्रह्म प्रसन्न होणार नाही' उलट ते 'वाग्वज्राचे' रुप धारण करुन म्हणण्याचा नाश करेल अशी श्रध्दा होती.

**पाठांतराच्या चार पध्दती होत्या -**

१ पदपाठ २.क्रमपाठ ३.जटापाठ ४.घनपाठ.

**(४) गुरुशिष्य संबंध -**

वैदिक शिक्षणपध्दतीत, गुरु हा शिष्याचा आध्यात्मिक पिता मानला जाई. **'Guri is the sprit of father'** आई-वडीलांपेक्षा त्याला अधिक मान देण्यात येई. अज्ञानाच्या अंधारातुन ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा वाटाळया म्हणुन त्याचे महत्व होते. गुरु शिवाय प्राविण्य मिळविणे शक्य

www.gimrws.in

**ISSN 976-9714**

*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-05, Issue-II November 2014*

नाही अशी कल्पना समाजात दृढ होती. वेदादी विद्या गुरु मुखाशिवाय शिकणे अशक्य असे लेखन कला अवगत झाल्यावर सुध्दा गुरुंचे महत्व वादादीत होते. वैदिक स्वर व उच्चार यांची कल्पना प्रत्यक्ष गुरु मुखाने जशी होई तशी पुस्तकावरुन येत नसे. वेद विद्येचा प्रसार झाल्यावर गुरुचे महत्व अधिकच वाढले. ब्रह्म विद्येचे गढ तत्वे गुप्त राखली जात. ती गुरुशिवाय कळत नसत. कला व उद्योग धंदे यामध्ये जे खरे उच्च प्रकारचे कौशल्य होते ते अनुभवी शिक्षकांच्या कडून प्रत्यक्ष मिळे म्हणुन उपयुक्त कलाच्या बाबतीत सुध्दा गुरुंचे महत्व साहजीकच मानले जाई. गुरु आपल्या मनाला साजेल अशी अग्री प्राप्त करी. कृती प्रत्येक विद्यार्थ्यांस निराळे शिकवी त्यामुळे स्वर कसे म्हणावयाचे, उच्चार कसा करावयाचा या गोष्टी सहज कळून येत. व्याकरण, न्याय, वेदान्त अशा शास्त्रांचे अध्ययन होत असे व वाद विवाद होई. गुरुपुढे शिष्यांना स्वमतखंडण व परमतखंडन करावे लागे त्यामुळे शिष्याचा विवरण शक्तीचा चांगला विकास होई.

उपनयन विधी झाल्यावर शिष्य गुरुगृही येत ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य वर्णिय यांनाच वेदाधिकार होता तेच अध्ययन करी वेदोक्तचारणामध्ये स्वराची जरी क्षुल्लक चूक झाली तरी त्यामुळे इष्ट प्राप्ती होणार नाही, सत्यानाश ओढवेल वेदपाठ अपभ्रष्ठ होतील अशी भिती असे. वेदाध्ययना व्यतिरिक्त इतर सर्व विद्या सर्वांना शिकता येत.

अध्यापनाच्या आधी गुरुदक्षिणा घेणाऱ्या गुरुची स्मृती इ. ग्रंथामध्ये निंदा केलेली आढळते शिष्यांकडून फी घेण्यांत येत नसे. शिष्य विद्येकरीता आल्यावर गुरु शक्य तितक्या लवकर त्याचा अभ्यासक्रम सुरु करी.शिकण्यास तत्परतेने विद्या न शिकविल्यामुळे एक गुरु पुढे आम्रवृक्षाच्या जन्मास कसा गेला अशी एक मनोरंजक कथा वाङ:मयात आढळते सर्व दानामध्ये विद्यादानच अधिक पुण्यप्रद मानले जाई. सतपात्र शिष्यास निरपेक्षपणे विद्यादान हे गुरुचे कर्तव्य कर्म असे.

शिष्य आपल्या ऐपती प्रमाणे अध्ययनानंतर गुरुदक्षिणा देत जनापवाद हो्ू नये म्हणून गुरुदक्षिणा दिली जात असे गरीब विद्यार्थी शिक्षण संपल्यावर शिक्षा मागुन गुरु दक्षिणेची रक्कम जमवी पोष्य नावाच्या राजाने आपल्या बायकोची अमुल्य कुंडले गुरुदक्षिणेकरिता याचना करणाऱ्या शिष्यास दिली होती अशी कथा आहे.

गुरुशिष्य संबंध पिता-पुत्र संबंधा प्रमाणे होते. शिष्याने गुरुस आई बापाप्रमाणे मान द्यावयाचा असे गुरुने शिष्यावर मुला प्रमाणे प्रेम द्यावयाचे असे 'मला माहीत आहे ते सर्व तुला शिकवीन' अशी औपचारीक शपथही गुरु घेत गुरु शिष्यांना आत्मीयतेने वागवित. गुरुग्रहाच्या संसारातील पडेल ते काम शिष्याने करावयाचे असे श्रीकृष्णांनी सांधीपनीच्या घरी अत्यंत कष्टाचेही कामे केली होती. नाठाळ शिष्यांना गुरु शिक्षाही करीत. उदा. थंड पाण्याचे स्नान, उपवास, गुरुगृह त्याग, शिष्य गुरु गृही राहत व जेवत त्यांचे परस्पर संबंध प्रेमाचे असत. एखादा शिष्य जावईही होई गुरु येईल त्या वेळी त्यास



www.ghrws.in

*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-05, Issue-II November 2014*

अत्यापन देऊन नमस्कार करावा त्यास उच्चास द्यावे त्यांच्या पेक्षा भपकेदार पोषाख घालु नये असा शिष्टाचार होता. गुरुच्या दोषाकडे शिष्याने नम्रतेने लक्ष वेधावे असाही संदर्भ आढळतो.

## संदर्भ ग्रंथ -

१) कुंडले, म.बा. 'शैक्षणिक तत्वज्ञान व समाजशास्त्र', श्रीविद्या प्रकाशन पुणे.

२) दुनाके अरविंद , (२००७)'उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण' डायमंड पब्लीकेशन, पुणे.

३) पेंडके प्रतिभा, (२०१०) 'शिक्षणाचे तात्विक आणि समाजशास्त्रीय भूमिका'विद्या प्रकाशन, नागपूर.

४) देशमुख एल.जी.'शिक्षणाचे तत्वज्ञान व समाजशास्त्र' फडके प्रकाशन. कोल्हापूर.

५) दिक्षित श्रीनिवास,'भारतीय तत्वज्ञान', फडके प्रकाशन. कोल्हापूर.

www.ghrws.in